Press Release




# Goa Tourism in association with Jumpin Heights launches Bungee Jumping at Mayem in Goa

**Goa, 27th August –** The Government of Goa, Department of Tourism and Goa Tourism Development Corporation (GTDC) in association with Jumpin Heights, the Bungee People today successfully launched India's second Bungee destination in North Goa at Mayem Lake. The event was graced with the presence of Hon'ble Chief Minister, Dr. Pramod Sawant. Other dignitaries present included the Hon'ble Tourism Minister, Mr. Manohar Ajgaonkar, Chairman of GTDC, Mr. Dayanand Sopte, MLA, Mayem Contituency, Mr. Pravin Zantye ,Secretary Tourism, Mr. J. Ashok Kumar, Director of Tourism, Mr. Sanjiv Gadkar and other officials from Dept of Tourism & GTDC. Also present were ZP member, Mayem, Mr. Shankar Chodankar, Sarpanch, Mayem Village Panchayat, Mrs. Kunda Mandrekar and other members of the Village Panchayat , Mayem.

The 55 meters bungee jumping platform stands tall over the gorgeous Mayem lake, in North Goa, about a 45 minute drive from the popular Baga Beach. Adventure sports are gaining traction in India and Goa, as India's favourite travel destination, was a natural choice for the next big adventure zone. Jumpin Heights is owned and run by ex-Army officer, Capt Rahul Nigam, who introduced Bungee jumping in India at Rishikesh in 2010. Over the course of this decade, they have successfully operated over 80,000 jumps in Rishikesh - quite a landmark for adventure tourism in India, and changed the way safety is perceived. The team adheres to Australia and New Zealand Safety Standards for operation of the Bungee Jumps.

The service provider has conducted required feasibility study and other mandatory pre-requisites for starting up of the bungee jumping activity at Mayem. This new adventure tourism initiative comes with no cost or investment for Goa Tourism Development Corporation. The GTDC however is assisting the service provider in obtaining required permissions and will be undertaking promotional activities for bungee Jumping which is being launched for the first time in Goa.

On the occasion of the launch, Ex-Capt. Rahul Nigam, Director and founder of Jumpin Heights said that "A little hand holding by an organisation like GTDC goes a long way in setting up such projects and facilitates ease of doing business."

The Bungee experience involves jumping from a height with rubber chords tied to your ankles, and swinging like a pendulum mid air. One can literally hear their own solitude as the wind gushes past with each rebound. There are several harnesses and checks in place to ensure an absolutely safe experience.

Jumpin Heights in Rishikesh has managed to change the face of adventure tourism in India. It is known to be one of the best experiences in South East Asia and has earned recognition from Ministry of Tourism. According to a survey in 2019, by Ministry of Tourism, they have been acknowledged as having played a key role in making Rishikesh the Adventure Capital of India. It will be interesting to see then, what magic Jumpin Heights now brings to Goa.

प्रेस रीलीज




## गोवा टुरिझमतर्फे जम्पिन हाइट्सच्या सहकार्याने गोव्यातील मायेम येथे बंजी जंपिंग लाँच

गोवा, 27 ऑगस्ट – गोवा सरकार, पर्यटन विभाग आणि गोवा पर्यटन विकास महामंडळ (जीटीडीसी) यांनी जम्पिन हाइट्स, द बंजी पीपलच्या सहकार्याने यशस्वीपणे भारतातील दुसरे बंजी डेस्टिनेशन उत्तर गोव्यातील मायेम तलाव येथे लाँच केले आहे. या कार्यक्रमासाठी माननीय मुख्यमंत्री श्री. प्रमोद सावंत उपस्थित होते. कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या इतर मान्यवरांमध्ये माननीय पर्यटन मंत्री, श्री. मनोहर आजगांवकर, जीटीडीसीचे अध्यक्ष, श्री. दयानंद सोपटे, पर्यटन सचिव, श्री. जे. अशोक कुमार, पर्यटन संचालक श्री. संजीव गडकर आणि पर्यटन विभाग तसेच जीटीडीसीचे इतर अधिकारी यांचा समावेश होता.

55 मीटर्सचे हे बंजी जंपिंग प्लॅटफॉर्म उत्तर गोव्यातील निसर्गरम्य मायेम तलावावर उभारण्यात आले असून बागा समुद्रकिनाऱ्यापासून हे ठिकाण 45 मिनिटांच्या अंतरावर आहे. भारतात साहसी क्रीडाप्रकारांची लोकप्रियता वाढत आहे आणि गोवा हे भारताचे आवडते पर्यटन स्थळ असल्यामुळे साहस पर्यटन क्षेत्रात त्याचा उदय होणे स्वाभाविक होते. जम्पिन हाइट्सची मालकी आणि त्याचे कामकाज माजी- सैन्यदल अधिकारी कॅप्टन राहुल निगम यांच्याकडे असून त्यांनीच 2010 मध्ये ऋषीकेश येथे बंजी जंपिंगची सुरुवात केलीहोती. गेल्या दशकभरात त्यांनी ऋषीकेशमध्ये 80 हजार जंप्सची यशस्वी हाताळणी केली असून हा आकडा भारतातील साहस पर्यटन क्षेत्रातील मापदंड समजला जातो तसेच त्यामुळे सुरक्षिततेकडे पाहाण्याचा

दृष्टीकोनही बदलला आहे. कंपनीची टीम बंजी जंपिंग कामकाजात ऑस्ट्रेलिया आणि न्यू झीलंडच्या तोडीचे सुरक्षा मापदंड राखते.

मायेम येथे बंजी जंपिग उपक्रम सुरू करण्यासाठी सेवा पुरवठादार कंपनीला व्यवहार्यता अभ्यास आणि इतर बंधनकारक पूर्व-अटी पूर्ण करणे आवश्यक होते. या नव्या साहस पर्यटन उपक्रमासाठी गोवा पर्यटन विकास महामंडळाला कोणताही खर्च आलेला नसून त्यांनी कोणत्याही प्रकारची गुंतवणूक केलेली नाही. मात्र, जीडीटीसी बंजी जंपिगसाठी आवश्यक परवाने मिळवून देण्यासाठी तसेच गोव्यात पहिल्यांदाच हा उपक्रम लाँच करताना आवश्यक प्रसार करण्यासाठी सहाय्य करत आहे.

लाँचप्रसंगी माजी कॅप्टन आणि जंम्पिन हाइट्सचे संचालक व संस्थापक राहुल निगम म्हणाले, ‘अशा प्रकारचा प्रकल्प प्रस्थापित करताना जीटीडीसीसारख्या संस्थेने दिलेला पाठिंबा दीर्घकालीन फायदेशीर ठरतो तसेच व्यवसाय करण्याचा सहजपणा त्यातून प्राप्त होतो.’

बंजी अनुभवामध्ये पायाच्या घोट्याला रबराची दोरी बांधून उंचावरून उडी मारून हवेत लंबकाप्रमाणे इकडून तिकडे फिरण्याचा समावेश होतो. प्रत्येक उसळीदरम्यान हवा जोराने वाहाताना ऐकत अक्षरशः आपले अस्तित्व अनुभवता येते. हा अनुभव सुरक्षित असावा यासाठी  काही हार्नेस वापरले जातात आणि तपासण्या केल्या जातात.

ऋषिकेश येखील जम्पिन हाइट्सने भारतातील साहस पर्यटनाचा चेहरा बदलला आहे. हा दक्षिण पूर्व आशियातील सर्वोत्तम अनुभव मानला जातो आणि त्याला पर्यटन विभागाची मान्यताही मिळाली आहे. 2019 मध्ये पर्यटन विभागाने केलेल्या एका सर्वेक्षणानुसार ऋषीकेशला भारताची साहस पर्यटन राजधानी बनवण्यात कंपनीने महत्त्वाची भूमिका बजावल्याचे सांगण्यात आले आहे. आता जम्पिन हाइट्स गोव्यात काय कमाल करते याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.